जावक क्र ८९७/२६
जिल्हा न्यायालय, यवतमाळ
दिनांक ०५/०२/२०२६
०५

**लिलावाची अधिसुचना**

**जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ यांचे न्यायालयात**

**लिलावाची दिनांक १६/०२/२०२६**

जुन्या ०७ क्युसेरा कंपनीच्या झेरॉक्स मशीनची विक्री करण्याकरीता जाहीर लिलाव करण्यात येत आहे. सदर लिलाव हा न्यायीक अधिकारी व कर्मचारी यांच्या समक्ष यवतमाळ येथील न्यायालयाचे आवारातील मागील बाजूस असलेल्या गॅरेज क्रमांक ०४ येथे दिनांक १६/०२/२०२६ रोजी दुपारी ०२.०५ वाजता चालविण्यात येईल. लिलावाच्या वेळी लिलावात स्वारस्य असणा—या सर्व लोकांना स्वत: किंवा यथोचितरित्या प्रधिकृत केलेल्या एजंटामार्फत हजर राहता येईल.

**लिलावाच्या इतर शर्ती व अटी खालीलप्रमाणे आहेत:—**

१. लिलावात बोली कोणत्या रक्कमेने सुरु करायची आहे हे लिलावात काम करणा—या अधिका—याकडुन ठरविण्यात येईल.

२. लिलाव किती रक्कमेस मागितला किंवा कोणी मागितला याबाबत कोणताही वाद उपस्थित झाल्यास ताबडतोब त्या वस्तुंचा पुन्हा लिलाव करण्यात येईल.

३. लिलावाचे काम करण्या—या अधिकारी यांना आवश्यक वाटल्यास संबंधीत अधिकारी सदर लिलाव प्रक्रिया स्थगित करण्याची कारणे नमुद करुन लिलावाचे काम स्थगित करु शकतो.

४. लिलावामध्ये उपस्थित झालेले खरेदीदार यांनी लिलावातील वस्तुंची एकुण किंमत त्याचदिवशी न्यायालयात जमा करणे आवश्यक राहील आणि लिलावातील वस्तु त्याचदिवशी न्यायालयातून घेवून जाण्याची जबाबदारी सदर खरेदीदार यांची राहील.

आदेशानुसार

प्रबंधक,

जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ.
दिनांक ०५/०२/२०२६

प्रतिलीपी:—

१. जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.
२. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.
३. तहसील कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.
४. जिल्हा परिषद कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.
५. नगर परिषद कार्यालय, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.
६. सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ येथील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी.

सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

आदेशानुसार

प्रबंधक,

जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ.
दिनांक ०५/०२/२०२६